# पंडित जवाहरलाल नेहरूच्या परराष्ट्र धोरणातील तत्त्वांचा अभ्यास

**राऊलवाड गंगाधर गंगाधर**
संशोधक, राज्यशास्त्र संशोधन केंद्र पीपल्स कॉलेज,
नांदेड
raulwadgangadhar@gmail.com

## प्रस्तावना

राष्ट्रीय उदिष्टांच्या पूर्तीसाठी केलेले प्रयोजन म्हणजे परराष्ट्र धोरण होय. आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राष्ट्र इतरांना प्रभावित करण्याचा प्रयत्न करतो. हा प्रयत्न राष्ट्रीय हितासाठी असतो. प्रभावित करण्यासाठी अनेक स्तरावर त्याचे प्रयत्न चालू असतात. या अनेक विविध प्रयत्नाचे एकत्रिकरण म्हणजे परराष्ट्र धोरण होय. इतर राष्ट्रांच्या वर्तमानात अपेक्षित बदल करण्याचा प्रयत्न होऊ नये यासाठी राष्ट्र प्रयत्न करीत असतात. कारण त्यावर राष्ट्रीय हिताची जपणूक अवलंबून असते. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात बदल झाला की, परराष्ट्र धोरणात बदल करावा लागतो. कारण परराष्ट्र धोरण हे राष्ट्रीय हिताशी संबंधित असते. ते साध्य करण्यासाठी बदलेल्या परिस्थितीत राष्ट्र आपले धोरण बदलत असतात. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर नवराष्ट्राच्या उभारणीच्या उभारणीत जवाहरलाल नेहरूंचे स्थान भारताच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे आहे. राष्ट्राची जडणघडण, राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप, समाजवादाचा आदर्श, परराष्ट्र धोरणाचा मुलभूत गाभा, अशा सर्वच क्षेत्रात नेहरूंचा वारसा आज भारत चालवित असलेले दिसते. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात उराशी बाळगलेल्या आशा आकांक्षाना मुर्त स्वरूप देण्याकरीता त्यांच्या कार्यकाळात झालेले प्रयत्न व त्यात आलेले यशापयश ही प्रामुख्याने नेहरूंच्या परराष्ट्र धोरणांची फलश्रुती समजली जाते.

भारतीय परराष्ट्र धोरणाचा आकृतिबंध तयार करण्यात नेहरूंचे योगदान मोलाचे आहे. भारतीय संस्कृतिचा वारसा, भारतीय तत्वज्ञानातील मूल्ये आणि गांधीपासून आधुनिकतेपर्यंतच्या विचारांचे सार एकत्रित करून नेहरूंनी भारतीय परराष्ट्र धोरणाची निश्चित असे मुलाधार निर्धारित केले.

## संशोधन पद्धती

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या वर्णनात्मक, ऐतिहाकिस, विश्लेषणात्मक आणि सांख्यिकीय पद्धती आहेत. यापैकी प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

## संशोधनाची गृहीतके

१. पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाच्या तत्त्वांची पार्श्वभूमी जाणून घेणे.
२. पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाच्या तत्त्वांचे महत्त्व जाणून घेणे.

**शांततेला पाठबळ देणे**

भारत स्वातंत्र झाल्यापासून नेहरूंनी शांततेच्या धोरणाचा पुरस्कार केला. त्यामुळे जगामध्ये कोणत्याही कारणामुळे तणाव निर्माण होणे पं. नेहरूंना धोकादायक वाटत होते. म्हणून सर्व राष्ट्रांनी युध्द टाळण्याची अधिक काळजी घेतली पाहिजे. असे त्यांचे मत होते. दुसऱ्या जागतिक महायुध्दाच्या कटू अनुभवानंतर जागतिक शांतता टिकविण्याच्या हेतुने संयुक्त राष्ट्र संघटनेची उभारणी करण्यात आली. नेहरूंनी संयुक्त राष्ट्र संघाच्या कार्यास अनुसरून आवश्यक ते धोरण स्वीकारले. संयुक्त राष्ट्रातर्फे शांतता प्रस्थापनेचे कार्य करण्यासाठी कांगो, सायप्रस इत्यादी प्रदेशात पाठविण्यात आलेल्या सैन्यामध्ये भारताचा सक्रिय सहभाग असल्याचे दिसून येते. साम्राज्यवादामुळे आशिया व आफ्रिका खंडातील बहुतांष राष्ट्र शतीग्रस्त झाली होती. त्यामुळेच त्या राष्ट्राची आर्थिक, राजकीय आणि नैतिक प्रगती खुंटली होती. जगातील साम्राज्यवादाचा शेवट झाल्याशिवाय मानव जातीचा विकास होणार नाही आणि जगात खऱ्या अर्थाने शांतता नांदणार नाही. असे पंडित नेहरूना वाटत होते.

भारताच्या परराष्ट्र धोरणात शांततेला महत्त्व असण्याचे अनेक कारणे आहेत. 'युद्ध आणि संघर्ष हे उदयोन्मुख भारताच्या आर्थिक आणि राजकीय विकासाला खीळ घालणारे आहेत हे भारताला सुरुवातीपासून कळून चुकले आहे. ऑगस्ट १९५२ मध्ये पणिवाकर म्हणाले, भारताची प्रगती आणि सर्वसाधारणपणे मानवजातीची प्रगती धोक्यात आणणारे कोणतेही युद्ध नसावे याबद्दल भारताला मनापासून काळजी वाटते. १९५६ मधील अरब घोषणा, इस्त्रायल युद्धामुळे भारताची अर्थव्यवस्था खूपच डळमळीत होऊ लागली. शातंतावादी धोरण राबवताना, पं. नेहरू म्हणाले, "आपले पहिले धोरण असे असले पाहिजे की, भयंकर आपत्तीना आपण रोखले पाहिजे, दुसरे धोरण ते टाळण्याचे असले पाहिजे आणि तिसरे धोरण आपण तो थांबवू शकलो पाहिजे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय वाद सोडविण्यासाठी भारत शांततापूर्ण मार्ग, द्विपक्षीय किवा त्रिपक्षीय वाटाघाटी आणि करार, लवाद, लवाद किंवा विचारविमर्श इत्यादीवर भर देतो, उदा. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत-पाकिस्तान वादामुळे निर्माण झालेला तणाव त्यावेळच्या नद्यांचे पाणीसंबंधी १९६० मध्ये सिधू पाणी करारने सोडवले गेले. १९६५ च्या मध्यात पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले तेव्हा कच्छचा प्रश्न यावर शांततापूर्ण मार्गाने तोडगा काढला. १९६६ मध्ये झालेल्या ताश्कंद करारात भारताने हे क्षेत्र पाकिस्तानला दिले, एप्रिल १९७४ च्या त्रिपक्षीय करारानुसार, बांग्लादेशाला अमानवी हल्ल्यासाठी खटला चालवायचा होता अशा युद्धकैद्यांनाही परत केले गेले. हे शांततापूर्ण सहजीवनाच्या धोरणाचे प्रतीक आहे की, राष्ट्रीय हिताचा त्याग करूनही, सप्टेंबर १९७७ चा पारक्का कराराद्वारे भारताने बांग्लादेशाला पाणीटंचाईच्या काळात गंगेचे अधिक पाणी देण्याचे मान्य केले आहे. एकंदरीत शांततेच्याद्वारे दक्षिण आशिया अथवा आशिया खंडात लोकशाही तत्वाचे मजबूतीकरण करून, युद्धमुक्त आशिया खंड व जागतिक शांतता निर्माण करण्यासाठी पंडित नेहरूयांनी शांततेला प्राधान्य दिले.

**नि:शस्त्रीकरणाला चालना**

शांतता भंग होण्याचे प्रमुख कारण म्हणजे राष्ट्राराष्ट्रामधील शस्त्रस्पर्धा होय. प्रथम आणि व्दितीय महायुध्दाची बिजे प्रामुख्याने या शास्त्रास्त्र स्पर्धेत होती. या दोन्ही युध्दांत झालेल्या भयंकर मानवी आणि भौतिक हानीमुळे संपूर्ण जगाला शांततेची आवश्यकता भासू लागली तसेच शांतता प्रस्थापित करण्याचे मार्ग म्हणजे निःशस्त्रीकरण आहे. हे जगाला कळून चुकले या कारणामुळे जर्मनी आणि त्यांच्या मित्रराष्ट्रांना निःशस्त्रीकृत करण्याचा प्रयत्न केला. परंतु एकीकडे काही जर्मनी आणि त्यांच्या मित्र राष्ट्राना निःशस्त्रीकृत करित असतानाच दुसरीकडे रशिया आणि अमेरिका या महाशक्तींना शस्त्रास्त्र निर्मितीवर भर देण्यास सुरुवात केली. त्यांनी परंपरागत शस्त्राऐवजी महाभयंकर अशा अणुशस्त्रांचा विकास करण्यास सुरुवात केली. या स्पर्धेत नंतर ब्रिटीश, फ्रान्स आणि चीन ही राष्ट्रेही सामील झाले आणि जग पुन्हा विनाशाच्या अंतिम टोकावर जाऊन पोहचले. ही अणुस्पर्धा संपूर्ण जगाचा नाश घडवून आणेल, असे जेव्हा प्रत्येक राष्ट्राला वाटू लागले तेव्हा त्यांनी निःशस्त्रीकरण आणि परमाणु शस्त्राच्या प्रसारावर नियंत्रण करण्याच्या दृष्टिने प्रयत्न करण्यास सुरुवात केली.

शस्त्रास्त्र स्पर्धा आणि अणुयुद्धांचा वाढता धोका लक्षात घेऊन नेहरूंनी आपल्या परराष्ट्र धोरणात निःशस्त्रीकरणाला महत्त्वाचे स्थान दिले. तसेच १९५८ साली युनोच्या १३ व्या अधिवेशनामध्ये भारताने नि:शस्त्रीकरण करण्यासाठी जगातील सर्व राष्ट्रांना समान नियम लागू करण्यासाठी प्रस्ताव मांडला. यातून नेहरूची नि:शस्त्रीकरणाची भूमिका लक्षात येते. पंडित नेहरूच्या नि:शस्त्रीकणाच्या तत्त्वांचा पाठपुरावा आजसुद्धा भारत सातत्याने करीत आहे.

**विकासाला प्राधान्य**

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर भारताची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. अशाचवेळी भारताच्या नेतृत्वाची सुत्रे पंडीत नेहरूंकडे आली होती. ती परिस्थिती विचारात घेता भारताला पंडीत नेहरू यांच्या प्रभावी व दूरदर्शी नेतृत्वामुळे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढणे शक्य झाले. भारतासारख्या मागासलेल्या आणि परंपरा-रुढीच्या बंधनात अडकून पडलेल्या देशात विज्ञाननिष्ट दृष्टिकोन रूजविणे ही अत्यंत कठिण गोष्ट होती. परंतु आधुनिक जगातील इतर प्रगत राष्ट्रांच्या बरोबरीचे स्थान भारताला प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचा स्वीकार केल्याशिवाय पर्याय नाही. हे नेहरूंनी अचुक ओळखले होते. तसेच भारतीय राज्यघटनेतसुद्धा वैज्ञानिक दृष्टिकोणाला चालणा देण्यात आली होती.

पंडित नेहरूनी राष्ट्रीय विकास हा परराष्ट्र धोरणाचा महत्त्वाचा घटक मानला होता. राष्ट्रीय विकास परराष्ट्र धोरणावर परिणाम करीत असतो. राष्ट्रीय विकासासाठी परराष्ट्रांची मदत पैशाच्या बाबतीत, तंत्रज्ञानाच्या बाबतीत, यंत्र सामुग्रीच्या बाबतीत किंवा देशांतर्गत नैसर्गीक संपत्ती वापरण्यासाठी हवी असेल तर अशा वेळी परराष्ट्र धोरण त्या अनुरूप करावे लागते. त्यासाठीच पंडीत नेहरूंनी सामर्थ्यशाली व प्रगत भारताचे स्वप्न उराशी बाळगले होते. त्याकरीता उद्योगधंदे व शेती यांच्या विकासावर भर देण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. या दृष्टिकोनातून त्यांनी नियोजनाच्या मार्गाचा स्वीकार करून

पंचवार्षिक योजना आखल्या व त्या यशस्वी करण्यासाठी आपली सर्व शक्ती पणाला लावली. नेहरू कालखंडातच भारताच्या औद्योगिकीकरणाचा पाया घातला गेला. अनेक प्रकारच्या मुलभूत उद्योगधंद्याची उभारणी करण्यात आली. मोठ मोठी धरणे व पाटबंधारे यांच्या योजनांना प्राधान्य देण्याचे धोरण राबविण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळातील भारताचे परराष्ट्र धोरण आर्थिक विकासाचे होते. भारताला विकासासाठी अनेक क्षेत्रात मदत हवी होती. ती मदत ज्या राष्ट्राकडून हवी होती त्या राष्ट्राचा राजकीय कल लक्षात घेऊन भारताने परराष्ट्र धोरण ठरविले होते. भारताला आर्थिक विकासासाठी शांतता हवी होती. लष्करावर कमीत कमी खर्च करावयाचा होता त्याच बरोबर कोणत्याही लष्करी गटात सामिल व्हावयाचे नव्हते कारण लष्करी गटात सामिल झाल्यानंतर ज्या गटात आपण सामिल झालो त्या गटाच्या प्रमुख राष्ट्रांचा आर्थिक हस्तक्षेप सुरू होतो. हे पंडित नेहरू जाणून होते.

**परस्परावलंबीकरण**

नेहरूंचे परराष्ट्र धोरण हे शितयुध्दाच्या काळात विकसित झालेले आहे. त्यामुळे शितयुध्दाच्या राजकारणाचा प्रभाव नेहरूंच्या परराष्ट्र धोरणावर होता. खरे तर आपण त्यावेळी आंतरराष्ट्रीय धोरण ठरवित असताना जी तत्त्वे निश्चित केलेली होती, त्याचे कारण असे की, १९४५ नंतर युरोपचे राष्ट्रकुलीन साम्राज्ये हळूहळू नष्ट होऊन जागतिक स्तरावर जागतिक शक्ती उदयाला आल्या. त्याचप्रमाणे आशिया-आफ्रिका खंडातील गुलाम राष्ट्रांमधील स्वातंत्र्य चळवळी यशस्वी होऊन मोलाची भर घातली. ह्या काळातील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे अणुशक्तीच्या विकासाने व तिच्या बाँबच्या स्वरूपात झालेल्या प्रथम वापराने संपूर्ण जागतिक राजकारण बदलून गेले. मानव व संपत्तीची प्रचंड हानी पाहून यापुढे जगात युध्द टाळणे, शांती कायम राखणे, देशामधील सहकार्य वाढवणे आणि घातक शस्त्रावर बंदी आणणे ही आंतरराष्ट्रीय राजकारणाची उद्दीष्ट्ये बनली. याच काळात अमेरिका व सोवियत रशिया ह्या दोन जागतिक महाशक्ती म्हणून उदयाला आल्या. याच काळात पंडीत नेहरूंनी आपल्या परराष्ट्र धोरणातच त्यांनी परस्परावलंबीकरणाला दिले होते. कारण त्याशिवाय भारताचा विकास शक्य नव्हता; याची नेहरूंना जाणीव होती. भारताची सर्वांगीण प्रगती समोर ठेऊन त्यांनी या तत्त्वाचा स्वीकार केला होता. आजही याच तत्त्वांचा तंतोतंत उपयोग केला जातो. या धोरणामुळेच आज आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरक्षा परिषदेतील पाच राष्ट्र बरोबरीचे स्थान भारताचे आहे. यांचे श्रेय नेहरू पुरस्कृत परराष्ट्र धोरणास आहे; हे निश्चित व वास्तविकपणे मान्य करावे लागते.

**सारांश**

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यापासून पंडित नेहरूंचा सक्रिय सहभाग असल्यामुळे त्यांना परिस्थितीची संपूर्ण जाणीव होती. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर कोणत्याही साम्राज्यवादी गटात शामील न होता. वेळप्रसंगी आवश्यक त्या राष्ट्रांकडून मदत घेण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले. भारताचा सर्वांगीण विकास करण्यासाठी जगात कायमची शांतता राहिले पाहिजे यासाठी युद्ध व शस्त्रास्त्र स्पर्धेला विरोध करून नि:शस्त्रीकरणाचाला

चालना दिली. तसेच भारतात मोठे मोठे उद्योगांची व धरणांची उभारणीकरण्यासाठी पंचवार्षिक योजनांचे धोरण स्वीकारले. शस्त्रास्त्र स्पर्धा व अणुयुद्ध टाळण्यासाठी युनोत नि:शस्त्रीकरणासाठी सातत्याने प्रयत्न केले. तसेच वेळप्रसंगी साम्राज्यवादी धोरणाला विरोध करून दुसऱ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठी कायमपणे पाठिंबा देण्याचे धोरण पंडित नेहरूनी स्वीकारल्याचे दिसून येते. पंडित नेहरूंच्या तत्त्वांचा आंतरराष्ट्रीय पातळीवर फार मोठा परिणाम झाल्याचे दिसून येते. आजही त्यांच्या तत्त्वांची उजळणी इतर राष्ट्रांकडून होताना दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१. नाईकवाडे अशोक (संपा.), जागतिक राजकारणातील भारताची भूमिका, राज्यस्तरीस चर्चासत्र शोध निबंध, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद २० सप्टेंबर २०१४
२. राजूरकर न. गो. व. कुरूंदकर नरहर, पंडीत नेहरू एक मागोवा, पद्मगंधा प्रकाशन, २६ जाने. २००८
३. नरूला बो. सी., राजनितिशास्त्र विश्वकोष खंड-१०, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, प्रथम संस्करण, २००९
४. डोळे ना. य., आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद,
५. जोशी गजानन नारायण व कांबळे श्रीनिवास रघुनाथ (संपा.), पंडीत जवाहरलाल नेहरूचे तत्वचिंतन, मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई, जानेवारी, १९९०
६. पंडीत नेहरू, भारताचा शोध, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे, १९९७, पृ.४५, ४६
७. ठोके मो. नि.. इतिहासाची पाने चाळताना आणि राजकारण अनुभवताना, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, ऑक्टोबर २०१७